क्र. १३६ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

०२ एप्रिल २०२३

## दु:खसहनाचा/ झावळ्याचा रविवार

### प्रस्तावना

'प्रभूच्या नावाने येत आहे. तो धन्य, परमस्वर्गात जयजयकार.'' ख्रिस्त राजांचा राजा होता. मात्र माणसाने निर्माण केलेला राजेशाही थाट त्याच्यासाठी नव्हता. ख्रिस्ताची राजवट वेगळ्या प्रकारची होती. दु:खीत पिडीत व गुलामगिरीत खितपत पडलेल्यांना मुक्तीचा मार्ग दाखविणारा पापी जगाचे तारण करण्यासाठी आत्मसमर्पण करून ह्या पृथ्वीवर ईश्वराचे राज्य स्थापन करणारा तो राजा होता. ख्रिस्ताने बेथानीहून येरुशलेम शहरात प्रवेश केला. तेव्हा लोकांनी त्याचा जयजयकार केला. हातात झावळ्या घेऊन त्याची मिरवणूक काढली व गौरव केला आणि ख्रिस्ताला आपला राजा म्हणून स्विकारले. आपणही हा विधी साजरा करीत असताना ख्रिस्ताला 'राजा' म्हणून स्विकारूया. हातात झावळ्या घेऊन मिरवणुकीने त्याचा गौरव करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे सर्वसमर्थ, सनातन परमेश्वरा, आमचा तारणारा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे तू मानवजातीला नम्रतेचे उदाहरण घालून दिले. मानव होऊन व क्रुसावर प्राणार्पण करुन त्याने तुझी इच्छा पूर्ण केली. त्याच्या दु:खसहनाचा आदर्श समोर ठेवून आम्ही तुझी साक्ष जगाला द्यावी म्हणून आम्हाला साहाय्य कर. त्याच्या पुनरुत्थानात सहभागी होण्यास आम्हाला पात्र कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

### पहिले वाचन

**यशयाच्या पुस्तकातून घेतलेले वाचन ५०:४-७**

**''उपमर्द व छिथू यांपासून मी आपले तोंड चुकवले नाही, कारण माझी फजिती होणार नाही हे मला ठाऊक होते.''**

यशया म्हणतो शिणलेल्यांस बोलून धीर कसा द्यावा ते समजावे म्हणून प्रभू परमेश्वराने मला शिष्याची जिव्हा दिली आहे. तो रोज सकाळी मला जागे करतो, शिष्यांप्रमाणे ऐकावे म्हणून माझे कान उघडतो. प्रभू परमेश्वराने माझे कान उघडले आहेत; म्हणून मी फितूर झालो नाही, मागे फिरलो नाही, मी मारण्या-यांपुढे आपली पाठ केली, केस उपटणा-यांपुढे मी आपले गाल केले; उपमर्द व छिथू यांपासून मी तोंड चुकवले नाही. प्रभू परमेश्वर मला साहाय्य करणार म्हणून तोंड चुकवले नाही.

प्रभू परमेश्वर मला साहाय्य करणार म्हणून मी लज्जित झालो नाही; मी आपले तोंड गारगोटीसारखे केले; माझी फजिती होणार नाही हे मला ठाऊक होते.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

२१:८-९, १७-१८, १९-२०, २३-२४

प्रतिसाद : **माझ्या देवा, माझ्या देवा, तू मला का अंतरलास?**

१. मला पाहणारे सर्व माझा उपहास करतात. ते वाकुल्या दाखवतात, ते थट्टेने डोके हालवतात. त्याने परमेश्वरावर आपला हवाला टाकला, तो त्याला मुक्त करो; तो जर त्याचा आवडता असेल तर तो त्याला सोडवो. (प्र)

२. कुत्र्यांनी मला वेढले आहे, दुर्जनांच्या टोळीने मला घेरले आहे. त्यांनी माझे हातपाय विंधिले आहेत. मला आपली सर्व हाडे मोजता येतात. (प्र)

३. ते माझी वस्त्रे आपसात वाटून घेतात. ते माझ्या झग्यावर चिठ्ठ्या टाकतात. हे परमेश्वरा, तू दूर राहू नको; हे माझ्या सामर्थ्या, माझ्या साहाय्यासाठी त्वरा कर ! (प्र)

४. मी आपल्या बांधवांजवळ तुझ्या नामाची किर्ती वर्णीन, ''अहो परमेश्वराचे भय धरणा-यांनो त्याचे स्तवन कराः याकोबचे वंशजहो, तुम्ही सर्व त्याचे गौरव करा. इस्त्राएलचे वंशजहो, तुम्ही सर्व त्याचे भय धरा.'' (प्र)

### दुसरे वाचन

**संत पौलाने फिलिप्पैकरांस पाठवलेल्या पत्रातून घेतलेले वाचन २:६-११**

**''त्याने स्वत:ला लीन केले; ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले.''**

ख्रिस्त येशू, तो देवाच्या स्वरुपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही; तर त्याने स्वत:ला रिक्त केले, म्हणजे मनुष्याच्या प्रतिरुपाचे होऊन दासाचे स्वरुप धारण केले आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रगट होऊन त्याने मरण आणि तेही क्रूसावरचे मरण स्वीकारले. येथपर्यंत आज्ञापालन करुन त्याने स्वत:ला लीन केले. त्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले; ह्यात हेतू हा की, स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा आणि देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभू आहे असे कबूल करावे.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**फिलिप्पै २:८-९**

ख्रिस्ताने मरण आणि तेही क्रूसावरचे मरण स्विकारले, येथपर्यत तो आज्ञाधारक झाला. ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले.

**संत मत्तयच्या शुभवर्तमानातून घेतलेले आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताचे दु:खसहन २६:१४- २७:६६**

**(प्रवचन)**

### श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, येशूचा पुनरुत्थानदिन जवळ येत आहे. दु:खसहन, मरण आणि पुनरुत्थान यांद्वारे स्नानसंस्कार घेतलेल्या आम्हांला आणि अखंड जगाला ख्रिस्ताच्या जीवनात अधिक सहभाग मिळावा म्हणून आपण प्रभूकडे मन:पूर्वक प्रार्थना करू या.

आपला प्रतिसाद असेल - **ऐकावी प्रार्थना, करितो मी याचना. (गायनात)**

१. आपले आध्यात्मिक मेंढपाळ बिशप (नाव) यांना त्यांच्या कामात प्रभूचा सतत वरदहस्त लाभावा व त्याच्या नेतृत्वाखाली आपल्या धर्मप्रांताची प्रगती होत रहावी, म्हणून आपण प्रार्थना करूया.

२. ईश्वरी प्रेमाच्या ओलाव्याने अनेकांच्या खडकाळ जीवनात मायेचा मळा फुलविण्यास, त्याचे जीवन सुजलाम सुफलाम करण्यास ईश्वरी प्रेरणा लाभावी, म्हणून आपण प्रार्थना करूया.

३. देहस्वभावाची व अंध:कारमय वाट सोडून देवून पवित्र आत्म्याच्या प्रभावाखाली असलेली निश्चित व प्रकाशमय वाट परमेश्वराने आपल्याला दाखवावी म्हणून आपण प्रार्थना करूया.

४. जीवनात जे निराश, आजारी, दु:खी, कष्टी आहेत अशांना ईश्वरी प्रेमाने आरोग्यदान लाभावे म्हणून आपण प्रार्थना करूया.

५. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक हेतूंसाठी, आपण प्रार्थना करूया.

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांजवळ रहा आणि आमच्या प्रार्थना ऐक. आमच्या अनेक गरजा आहेत. परंतु आम्हाला त्या व्यक्त करता येत नाहीत. त्या तू जाणतोस. म्हणूनच तुझा पुत्र येशू ख्रिस्त ह्याच्या मरण आणि दु:खसहनाद्वारे आम्ही तुझ्या साहाय्याची याचना करतो. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तुझा एकुलता पुत्र, येशू ह्याच्या यातना व मृत्युमुळे आम्ही तुला प्रिय बनोत. एकट्याने आम्ही काही मिळवू शकत नाही. या परिपूर्ण समर्पणामुळे तुझे प्रेम व तुझी दया आम्हाला लाभो. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, या ख्रिस्तप्रसादरुपी अन्नाने तू आमची भूक तृप्त केली आहेस. तुझ्या पुत्राच्या मृत्युमुळे आम्हाला आशेचा दीप दिसत आहे व आमची श्रध्दा दृढ बनत आहे. त्याच्या पुनरुत्थानामुळे आम्हाला धीर व चिकाटी मिळो व पूर्ण मुक्तीकडे आमची वाटचाल होवो. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

पवित्र आठवड्यामध्ये ह्या ख्रिस्तसभा प्रभू येशू ख्रिस्ताच्या दु:खसहन रहस्यामध्ये प्रवेश करीत आहे. आजची वाचने येशूचे दु:खसहन (यशया ५७:४-७) त्याची नम्रवृत्ती (फिलिप्पै २:६-११) आणि मशिहा म्हणून त्याचा अधिकार (मत्तय २६:१३-२७-६६) ह्या पैलूंकडे आपले लक्ष वेधून घेत आहेत. संत मत्तयने येशूचे दु:खसहन चार टप्प्यांमध्ये सादर केलेले आहे.

**अ) गेथशेमाने बागेतील यातना:** ह्या टप्प्यामध्ये आपल्या दु:खसहनाची जाणीव असणारा येशू शिष्यांना प्रार्थना करण्याचे आवाहन करतो. तो स्वत:देखील देवपित्याकडे प्रार्थना करतो. त्यामुळे दु:खसहनाला सामोरे जाण्यासाठी त्याला मनोबल प्राप्त होते. याउलट प्रार्थनेपेक्षा झोपेला अग्रक्रम देणारे शिष्य ऐन परीक्षेच्या प्रसंगी अपयशी ठरतात कारण त्यांनी पुरेशी दीर्घकाळ आणि मनापासून प्रार्थना केली नाही.

**ब) यहुदी अधिकाऱ्यांसमोर येशूची चौकशी :** ह्या चौकशीदरम्यान येशूवर करण्यात आलेले आरोप धार्मिक स्वरूपाचे होते. येशू मात्र आपल्या दैवी सामर्थ्याने ह्या आरोपांना निर्भयपणे सामोरा जातो.

**क) येशूची पिलातसमोर चौकशी :** इथे केले जाणार आरोप हे राजकीय स्वरूपाचे होते. यहुदी अधिकाऱ्यांनी येशूला मरणदंड देण्याचा निर्वाळा दिला होता. मात्र हे मरण क्रूसावरचे असण्यासाठी त्यांना रोमी अधिकाऱ्यांच्या संमतीची गरज होती. इथेही येशू 'यहुद्यांचा राजा' म्हणून धैर्याने मरण स्वीकारायला तयार होतो.

**ड) येशूच्या यातना, मृत्यू आणि दफन :** येशूच्या मृत्यूसमयी आकाशात (तीन तास अंधकार), पृथ्वीवर (धरणीकंप खडक फुटले व पृथ्वीखाली कित्येक थडगी उघडली गेली, मेलेली माणसे जिवंत झाली) अशा तिन्ही ठिकाणी त्याचे पडसाद उमटले. ही चिन्हे नव्या युगाची दृश्ये प्रतीके होती (यहेज्केल ३७:१२-१३). येशूच्या मृत्यूने परराष्ट्रीयांना सोबत घेणाऱ्या नव्या इस्राएलची प्रस्थापना झाली होती. दु:खभोग सोसणारा मशिहा आता गौरवशाली मशिहा बनलेला होता. शताधिपतीने तशी कबुलीही दिली.

**आत्मपरीक्षण :** येशूच्या दु:खसहन रहस्यातील कोणकोणते घटक मला माझ्या जीवनातील दु:खे व संकटे ह्यांना सामोरे जाण्यास मला प्रेरणा देतात?

•••

| एप्रिल २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | दुसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम ०३ | आफ्रिकेचे सं बेनेडिक्ट (जां) | : यशया ४२:१-७/योहान १२:१-११ |
| मंगळ ०४ | सं इजिदोर (जां) | : यशया ४९:१-६/योहान १३: २१-३८ |
| बुध ०५ | सं विन्सेंट फेरेर (जां) | : यशया ५०:४-९/मत्तय २६: १४-२५ |
| गुरु ०६ | पवित्र/आज्ञा गुरुवार (पां) | : निर्गम १२:१-१४/करिंथ.११:२३-२६/योहान १३:१-१५ |
| शुक्र ०७ | पवित्र शुक्रवार (तां) | : यशया ५२:१३-५३:१२/इब्री.४:१४-१६,५:७-९/योहान१८:१-१९:४२ |
| शनि ०८ | पवित्र शनिवार | |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)